Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P021

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

# सार्वजनिक महसूल : भारत एक दृष्टीक्षेप

डॉ. एस. एम. कोल्हापूरे
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली
९८३४३३८९१७

*Received on: 16 May ,2024* *Revised on: 20 June ,2024* *Published on: 30 June ,2024*

**गोषवारा:**

सार्वजनिक उत्पन्न म्हणजे सरकारला निरनिराळ्या मार्गाने प्राप्त होणारी एकूण मिळकत होय. शासन देशातील जनतेसाठी विविध सुविधा निर्माण करण्याचे कार्य करत असते. ते कार्य करण्यासाठी विविध मार्गाने उत्पन्न मिळवावे लागते. त्याचे दोन मार्ग किंवा स्त्रोत आहेत. एक कर मार्ग आणि दुसरा करेतर मार्ग. कररूपी उत्पन्नामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचा समावेश होतो, तर करेतर उत्पन्नामध्ये शुल्क, दंड, देणगी, सार्वजनिक उद्योगांचा नफा आदींचा समावेश होतो. भारत सरकारच्या एकूण प्राप्तीमध्ये महसुली प्राप्ती म्हणजेच कर आणि करेतर उत्पन्न, ज्याच्यातून देयता निर्माण होत नाहीत. तर भांडवली प्राप्तीमध्ये सार्वजनिक कर्जाचा, ज्यातून देयता निर्माण होतात यांचा समावेश होतो. महसुली उत्पन्नामधील करांच्या माध्यमातून भारत सरकारला बिगर कर महसुलाच्या तुलनेत अधिक उत्पन्न प्राप्त होते. सन १९८०-८१ मध्ये एकूण कररुपी महसुलामध्ये अप्रत्यक्ष करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण अधिक होते. नंतरच्या कालावधीत या प्रमाणामध्ये घट झाली आहे. सध्या (२०२३-२४) प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचे कररुपी उत्पन्नामध्ये जवळपास समप्रमाण आहे. तसेच भारत सरकारच्या एकूण उत्पन्नामध्ये महसुली प्राप्तीचे प्रमाण भांडवली प्राप्तीच्या तुलनेने अधिक आहे.

**मुख्य शब्द** : सार्वजनिक खर्च, सार्वजनिक उत्पन्न, महसुली प्राप्ती, भांडवली प्राप्ती, प्रत्यक्ष कर, अप्रत्यक्ष कर, निर्गुंवणूक.

**प्रस्तावना:**

सार्वजनिक राजस्व, सार्वजनिक महसूल आणि सार्वजनिक उत्पन्न या विविध संकल्पना पर्यायी अर्थाने वापरल्या जातात, ज्यांचा संबंध सरकारच्या उत्पन्नाशी आहे. सार्वजनिक उत्पन्न म्हणजे सरकारला निरनिराळ्या मार्गाने प्राप्त होणारी एकूण मिळकत होय. शासन देशातील जनतेसाठी विविध सुविधा निर्माण करण्याचे कार्य करत असते. ते कार्य करण्यासाठी विविध मार्गाने उत्पन्न मिळवावे लागते. त्याचे दोन मार्ग किंवा स्त्रोत आहेत.

**सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत:**

**अ) कर स्त्रोत:**

कर आकारणी करण्याचे कार्य फक्त सार्वजनिक सत्ताच करू शकते. भारतामध्ये केंद्रसरकार, राज्यसरकारे व स्थानिक स्वराज्य संस्था कर आकारणी करू शकतात. कर महसूल केंद्र सरकारकडून आकारण्यात येणाऱ्या विविध करांच्या माध्यमातून जमा केला जातो. कर हा सार्वजनिक उत्पन्नाचा / महसुलाचा महत्वाचा स्त्रोत आहे. कर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन स्वरूपाचे असतात.

**१) प्रत्यक्ष कर:**

प्रत्यक्ष कर असे कर असतात ज्या करांचे संक्रमण किंवा हस्तांतरण करणे शक्य नसते. असे कर इतर व्यक्तींवर हस्तांतरित करता येत नाहीत. ज्या व्यक्तीवर असे कर आकारले जातात त्याच व्यक्तीच्या उत्पन्नातून या करांच्या रकमेचा भरणा करावा लागतो. या करांमध्ये उत्पन्न कर, महामंडळ कर, HUF आणि इतर व्यवसायांच्या उत्पन्नावर आणि मालमत्तेवर आकारला जाणारा कर - जमीन कर, मालमत्ता कर, संपत्ती कर आदींचा समावेश होतो. प्रत्यक्ष कर हा प्रगतीशील कर आहे, म्हणजे उत्पन्न वाढीच्या प्रमाणात कराच्या रकमेमध्ये वाढ होत जाते.

**२) अप्रत्यक्ष कर:**

अप्रत्यक्ष कराचे हस्तांतरण दुसऱ्या व्यक्तींवर करता येते. म्हणजेच ज्या व्यक्तीवर किंवा व्यावसायिकावर कराची आकारणी केली आहे, तो व्यक्ती किंवा व्यावसायिक कराचा भरणा स्वतःच्या उत्पन्नातून न करता तो इतरांकडून वसूल करतो आणि कराचा भरणा करतो. यामध्ये सेवा कर, करमणूक कर, विक्री कर, उत्पादन शुल्क, सीमा शुल्क आदी करांचा समावेश आहे. संपूर्ण देशात एक करप्रणाली लागू करण्याच्या दृष्टीने जुलै २०१७ मध्ये भारत सरकारने वस्तू व सेवा कर लागू केला, परंतु काही वस्तूंवर जी.एस.टी. ऐवजी इतर कर लागू आहेत.

**आ) करेतर स्त्रोत:**

यामध्ये शुल्क – सरकारी सेवेचा लाभ घेताना आकारलेली रक्कम (मालमत्ता नोंदणी शुल्क), दंड – नियमाचे उल्लंघन केले असता दंड आकारला जातो, देणगी- देशातील नागरिक, विदेशी सरकारे, संस्था यांच्याकडून सरकारला मिळालेली देणगी, सार्वजनिक कंपनीतील नफा, जप्त केलेली मालमत्ता, कर्ज, वारस नसलेली मालमत्ता यासारखे बिगर कर मार्ग शासकीय महसुलाचे आहेत.

**भारत सरकारचा कर आणि करेतर महसूल:**

**अ) भारत सरकारचा कर महसूल:**

तक्ता: भारत सरकारचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर महसूल (कोटी रु.)


| वर्ष | कर महसूल (निव्वळ) | प्रत्यक्ष कर (निव्वळ) | प्रत्यक्ष कराचे एकूण कर महसूलाशी प्रमाण | अप्रत्यक्ष कर | अप्रत्यक्ष कराचे एकूण कर महसुलाशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1980-81 | 9358 | 1893 | 20.23 | 7465 | 79.77 |
| 1990-91 | 42978 | 6903 | 16.06 | 36075 | 83.94 |
| 2000-01 | 136658 | 49651 | 36.33 | 87007 | 63.67 |

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P021
e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2010-11 | 569868 | 313501 | 55.01 | 256367 | 44.99 |
| 2011-12 | 629764 | 343310 | 54.51 | 286454 | 45.49 |
| 2012-13 | 741877 | 396585 | 53.46 | 345292 | 46.54 |
| 2013-14 | 815854 | 455829 | 55.87 | 360025 | 44.13 |
| 2014-15 | 903615 | 500531 | 55.39 | 403085 | 44.61 |
| 2015-16 | 943765 | 449296 | 47.61 | 494469 | 52.39 |
| 2016-17 | 1101372 | 521287 | 47.33 | 580085 | 52.67 |
| 2017-18 | 1242488 | 606216 | 48.79 | 636272 | 51.21 |
| 2018-19 | 1317211 | 723492 | 54.93 | 593719 | 45.07 |
| 2019-20 | 1356902 | 638365 | 47.05 | 718537 | 52.95 |
| 2020-21 | 1426287 | 583210 | 40.89 | 843077 | 59.11 |
| 2021-22 | 1804793 | 865386 | 47.95 | 939407 | 52.05 |
| 2022-23 | 2086662 | 1066827 | 51.13 | 1019835 | 48.87 |
| 2023-24 | 2330631 | 1178268 | 50.56 | 1152363 | 49.44 |

Source: Handbook of Statistics on Indian Economy 2022-23

Note: Data for 2022-23 are Revised Estimates and Data for 2023-24 are Budget Estimates



वरील तक्त्यामध्ये भारत सरकारचा १९८०-८१ ते २०२३-२४ या कालावधीतील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर महसूल दर्शविला आहे. १९८०-८१ मध्ये एकूण कर महसूल ९३५८ कोटी रु. होता. यामध्ये वाढ होऊन तो सन २०२३-२४ मध्ये २३३०६३१ कोटी रु. झाला आहे. १९८०-८१ मध्ये एकूण कर महसुलामध्ये प्रत्यक्ष कराचे प्रमाण जवळपास २० टक्के इतके तर अप्रत्यक्ष करांचे प्रमाण ८० टक्के होते. २०२३-२४ पर्यंत एकूण कर महसुलामध्ये प्रत्यक्ष करांचे प्रमाण वाढून ५०.५६ टक्के झाले आहे तर अप्रत्यक्ष करांचे प्रमाण कमी होऊन ते ४९.४४ टक्के झाले आहे. सध्या एकूण कर महसुलामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचे प्रमाण जवळपास निम्मे-निम्मे आहे.

**ब) भारत सरकारचा करेतर महसूल:**

तक्ता: भारत सरकारचा करेतर महसूल (कोटी रु)

| वर्ष | बिगर कर महसूल | बिगर कर महसूलाचे एकूण महसुली प्राप्तीशी प्रमाण |
|---|---|---|
| 1 | 9 | |
| 1980-81 | 3015 | 24.37 |
| 1990-91 | 11976 | 21.79 |
| 2000-01 | 55947 | 29.05 |
| 2010-11 | 218602 | 27.72 |
| 2011-12 | 121672 | 16.19 |
| 2012-13 | 137354 | 15.62 |
| 2013-14 | 198870 | 19.6 |
| 2014-15 | 197766 | 17.96 |
| 2015-16 | 251260 | 21.03 |
| 2016-17 | 272831 | 19.85 |
| 2017-18 | 192745 | 13.43 |
| 2018-19 | 235704 | 15.18 |
| 2019-20 | 327157 | 19.43 |
| 2020-21 | 207633 | 12.71 |
| 2021-22 | 365112 | 16.83 |
| 2022-23 | 261751 | 11.15 |


Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P021

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

| | | |
|---|---|---|
| 2023-24 | 301650 | 11.46 |

Source: Handbook of Statistics on Indian Economy 2022-23

Note: Data for 2022-23 are Revised Estimates and Data for 2023-24 are Budget Estimates




वरील तक्ता आणि आकृतीवरून असे दिसून येते की, सरकारच्या बिगर कर महसुलामध्ये १९८०-८१ ते २०२३-२४ या कालावधीत ३०१५ कोटी रु. वरून ३०१६५० कोटी रु. इतकी वाढ झाली आहे. वरील कालावधीत बिगर कर महसुलाच्या रकमेमध्ये वाढ झाली असली तरी बिगर कर महसुलाचे एकूण महसुली प्राप्तीमधील प्रमाण २४.३७ टक्क्यांवरून ११.४६ टक्के इतके कमी झाले आहे.

**भारत सरकारची महसुली प्राप्ती आणि भांडवली प्राप्ती:**

महसुली प्राप्ती दायित्व किंवा देयता निर्माण करत नाहीत किंवा सरकारची मालमत्ता कमी करत नाहीत. या प्राप्ती नियमित आणि आवर्ती असतात. यामध्ये सरकारचे कर आणि करेतर प्रप्तींचा समावेश होतो. यांचा कालावधी अल्प म्हणजेच साधारणतः एक वर्षासाठीचा असतो. तर भांडवली प्राप्ती या देयता निर्माण करतात किंवा सरकारची मालमत्ता कमी करतात. यामध्ये प्रामुख्याने सरकारी कर्ज - सेक्युरीटीज जारी करणे, ट्रेझरी बिले, विवध पेन्शन योजना, बाह्य कर्ज, सुवर्ण रोखे आणि निर्गुंतवणूक आदी भांडवली प्राप्तीची उदाहरणे आहेत. याचा कालावधी दीर्घ असतो.


भारत सरकारचे महसुली आणि भांडवली प्राप्ती (कोटी रु.)

| वर्ष | महसुली प्राप्ती | महसुली प्राप्तीचे एकूण प्राप्तीशी प्रमाण | भांडवली प्राप्ती | भांडवली प्राप्तीचे एकूण प्राप्तीशी प्रमाण | एकूण उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 11 | | 12 | | 13 |
| 1980-81 | 12373 | 60.98 | 7918 | 39.02 | 20291 |
| 1990-91 | 54954 | 58.49 | 38997 | 41.51 | 93951 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2000-01 | 192605 | 58.94 | 134184 | 41.06 | 326789 |
| 2010-11 | 788471 | 66.21 | 402428 | 33.79 | 1190899 |
| 2011-12 | 751437 | 56.91 | 568918 | 43.09 | 1320355 |
| 2012-13 | 879232 | 60.16 | 582152 | 39.84 | 1461383 |
| 2013-14 | 1014724 | 64.28 | 563894 | 35.72 | 1578618 |
| 2014-15 | 1101381 | 69.45 | 484448 | 30.55 | 1585829 |
| 2015-16 | 1195025 | 67.23 | 582579 | 32.77 | 1777604 |
| 2016-17 | 1374203 | 69.26 | 609886 | 30.74 | 1984089 |
| 2017-18 | 1435233 | 67.13 | 702650 | 32.87 | 2137883 |
| 2018-19 | 1552916 | 67.04 | 763518 | 32.96 | 2316434 |
| 2019-20 | 1684059 | 62.81 | 997301 | 37.19 | 2681360 |
| 2020-21 | 1633920 | 46.46 | 1883105 | 53.54 | 3517024 |
| 2021-22 | 2169905 | 57.23 | 1621353 | 42.77 | 3791258 |
| 2022-23 | 2348413 | 56.04 | 1842061 | 43.96 | 4190474 |
| 2023-24 | 2632281 | 58.30 | 1882603 | 41.70 | 4514884 |

Source: Handbook of Statistics on Indian Economy 2022-23

Note: Data for 2022-23 are Revised Estimates and Data for 2023-24 are Budget Estimates



वरील तक्ता आणि आकृतीमध्ये भारत सरकारची १९८०-८१ ते २०२३-२४ या कालावधीतील महसुली प्राप्ती आणि भांडवली प्राप्ती दर्शविली आहे. वरील कालावधीत महसुली प्राप्तीमध्ये १२३७३ कोटी रु. वरून २६३२२८१ कोटी रु. इतकी वाढ झाली आहे. तर भांडवली प्राप्तीमध्ये ७९१८ कोटी रु. वरून १८८२६०३ कोटी रु. इतकी वाढ झाली आहे. सन १९८०-८१ मध्ये महसुली प्राप्तीचे एकूण प्राप्तीशी असलेले प्रमाण ६०.९८ टक्के इतके होते. ते २०२३-२४ मध्ये ५८.६० टक्के इतके झाले आहे. तर भांडवली प्राप्तीचे एकूण प्राप्तीशी असलेले प्रमाण ३९.०२ टक्के वरून ४१.७० टक्के इतके झाले आहे. या कालावधीत महसुली आणि भांडवली प्राप्तीचे एकूण प्राप्तीशी असलेल्या प्रमाणामध्ये चढ-उतार दिसून येतात. या कालावधीत सन २०२०-२१ हे वर्ष वगळता एकूण प्राप्तीमध्ये महसुली प्राप्तीचे प्रमाण भांडवली प्राप्तीच्या तुलनेने अधिक राहिलेले आहे.

थोडक्यात भारत सरकारला विविध उपक्रमांवर खर्च करण्यासाठी विविध मार्गांनी उत्पन्न जमा करावे लागते. महसुली प्राप्ती आणि भांडवली प्राप्ती असे दोन प्रकारांत सरकारी उत्पन्नाचे वर्गीकरण केले जाते. महसुली उत्पन्नामधील करांच्या माध्यमातून भारत सरकारला बिगर कर महसुलाच्या तुलनेत अधिक उत्पन्न प्राप्त होते. सन १९८०-८१ मध्ये एकूण कररुपी महसुलामध्ये अप्रत्यक्ष करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण अधिक होते. नंतरच्या कालावधीत या प्रमाणामध्ये घट झाली आहे. सध्या (२०२३-२४) प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचे कररुपी उत्पन्नामध्ये जवळपास समप्रमाण आहे. तसेच भारत सरकारच्या एकूण उत्पन्नामध्ये महसुली प्राप्तीचे प्रमाण भांडवली प्राप्तीच्या तुलनेने अधिक आहे.

**संदर्भ:**

1. Handbook of Statistics on Indian Economy 2022-23
2. B.P. Tyagi, “Public Finance”, Jai Prakash Nath and Co. Meerut, 2010-11.
3. H. L. Bhatiya, “Public Finance”, Vikas Publishing House Pri. Ltd. New Delhi. 2017.
4. R. K. Lekhi, “Public Finance”, Kalyani Publishers, New Delhi, 2012.
5. B. P. Tyagi and H. P. Singh, “Public Finance”, Jai Prakash Nath and Co. Meerut, 2012-13.

N. Radhakrishnan, “Public Finance Theory and Approach”, Vrinda Publication, Delhi. 2013.